राज्यातील हातमाग विणकरांकरिता उत्कृष्ट कापड
उत्पादन स्पर्धा बक्षिसांच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
शासन निर्णय क्र. हातमाग २००८/प्र.क्र. ९७/टेक्स-३.
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ सप्टेंबर, २००८.

वाचा -

१) कृषि व सहकारी शासन निर्णय क्रमांक सीटीएस/१०७२/३७९५/सी २(१), दिनांक ५/१०/१९७२.

२) सहसंचालक (तांत्रिक) वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन,नागपूर यांचे पत्र क्रमांक कार्या ४/हा. कापड स्पर्धा/ बक्षिसे/७९१५/०८, दिनांक ४ जुलै, २००८.

**प्रस्तावना** :- राज्यातील हातमाग व्यवसायाच्या समस्यांचा अभ्यास करुन त्या सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी मा. श्री. तिडके, वि.स.स. यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी पारंपारिक व अपारंपारिक डिझाईनच्या अत्युत्कृष्ट कापड उत्पादन करणा-या विणकरांसाठी विविध स्तरावर स्पर्धा आयोजित करुन बक्षीस देण्याची योजना संदर्भाधीन क्र. १ येथील दिनांक ५/१०/१९७२ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार पारंपारिक व अपारंपारिक वाणाचे कापड उत्पादन करणा-या विणकरांकरिता राज्य स्तरावर प्रत्येकी एक स्पर्धा आयोजित करुन पहिले, दुसरे व तिसरे बक्षीस अनुक्रमे रुपये १,०००/- रुपये ६००/- व रुपये ४००/- इतक्या रकमेचे देण्यात येते. तसेच जिल्हा स्तरावर ६ ठिकाणी व अनुसूचीत जातींच्या विणकरांसाठी ५ ठिकाणी स्वतंत्र स्पर्धा आयोजित करुन प्रत्येकी रुपये ५००/-, रुपये ३००/- व रुपये २०० /- ची तीन बक्षिसे देण्यात येत आहेत. मागील ३५-३६ वर्षात रुपयाच्या मुल्यामध्ये झालेली घट व वाढती महागाई विचारात घेवून बक्षीसांच्या रक्कमेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- प्रस्तावनेत नमूद केलेल्या वस्तुस्थितीच्या अनुषंगाने पारंपारिक व अपारंपारिक डिझाईन्सच्या अत्युत्कृष्ट कापड उत्पादन करणा-या हातमाग विणकरांच्या विविध स्पर्धांच्या बक्षिसांच्या

रकमेत व आयोजनाकरिता आवश्यक असलेल्या खर्चासाठी अर्थसहाय्याच्या रकमेत पुढील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार वाढ करण्यास या आदेशान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम रुपये)

DIRECTORATE OF TEXTILES
Govt. of Maha. NAGPUR.
९४०८
03 NOV 2008
INWARD No.
Desk No. ४

| स्पर्धेचे प्रकार व स्पर्धाची संख्या | पारंपारीक व अपारंपारीक वाणाकरिता प्रत्येकी हातमाग परंपरागत वाणाकरिता द्यावयाच्या बक्षिसांची रक्कम | | | पारंपारीक व अपारंपारीक स्पर्धाच्या आयोजनाकरिता आवश्यक प्रशासकीय खर्चासाठी अर्थसहाय्याची रक्कम |
|---|---|---|---|---|
| | पहिले बक्षीस | दुसरे बक्षीस | तिसरे बक्षीस | |
| राज्यस्तरीय हातमाग कापड स्पर्धा (फक्त एका ठिकाणी) | २५,००० | २०,००० | १५,००० | २४,००० |
| जिल्हास्तरीय हातमाग कापड स्पर्धा (एकूण ६ ठिकाणी) | १०,००० | ५,००० | ३,००० | ७२,००० |
| अनुसूचीत जातीच्या विणकरांसाठी हातमाग कापड स्पर्धा (एकूण ५ ठिकाणी) | १०,००० | ५,००० | ३,००० | ६०,००० |
| एकूण वार्षिक खर्च | २,७०,००० | १,५०,००० | ९६,००० | १,५६,००० |

**अटी व शर्ती :-** १) पारंपारिक व अपारंपारिक वाणासाठी स्वतंत्र बक्षीस देण्यात येत असले तरी या दोन्ही वाणाच्या स्पर्धा एकाच ठिकाणी घेण्यात याव्यात.

२) सदर स्पर्धा आयोजित करण्यासाठी येणा-या खर्चास उपरोक्त मर्यादेत मान्यता देण्याचे अधिकार, संचालक, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर यांना प्रदान करण्यात येत आहे.

३) स्पर्धेचे आयोजन, नियंत्रण व स्थाननिश्चिती करण्याची जबाबदारी संचालक, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर यांची राहील.

या स्पर्धा आयोजनावरील संपूर्ण खर्च मागणी क्रमांक व्ही-२, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११० संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, ११० (०२)(५०) हातमाग उद्योगाच्या विकारसाकरिता सूट व इतर अर्थसहाय्य, ०५- बक्षिसे (२२५१ ०११९) या लेखाशिर्षाखाली खर्ची दाखविण्यात येऊन त्याखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४९५/२००८/व्यय २, दिनांक १/९/२००८ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

DIRECTOR
Govt. of Maha. N...
7890
03 Nov 2008
...D No.
...No. 4 24

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( र. मो. आडे )
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,

१) संचालक, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२ मुंबई/ नागपूर
३) जिल्हा कोषागार अधिकार, नागपूर
४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर
५) व्यवस्थापकीय संचालक, महाटेक्स, मुंबई.
६) वित्त विभाग (व्यय २), मंत्रालय, मुंबई.
७) कार्यासन १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग (सर्व)
९) निवड नस्ती (टेक्स ३)

D:\old data\c\TEX 3\HANDLOOM\TEX-3(G.R.)